# PROSPECTUS

## माहिती पत्रक



धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित

# शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव

**NAAC Accredited 'B' Grade**

(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न)

स्थापना २०००

गट नं. ७८/५, शंकरराव नगर, जुना खेडी रोड, कालिंका माता मंदिरासमोर,जळगाव-भुसावळ हायवे लगत,
जळगांव. फोन : ०२५७-२२३४९२८

# प्रेरणास्त्रोत



**स्व. लोकसेवक मधुकरराव धनाजी चौधरी**
संस्थापक अध्यक्ष
धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी, जळगाव

## धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी, जळगाव

# कार्यकारिणी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आ.श्री. शिरीष मधुकरराव चौधरी | अध्यक्ष |
| २. | मा.श्री. सुनिल मधुकर पाटील | उपाध्यक्ष |
| ३. | मा.प्रा.डॉ. श्री. प्रमोद रामभाऊ चौधरी | सचिव |
| ४. | मा.श्री. पुरुषोत्तम यशवंत पाटील | सहसचिव |
| ५. | मा.श्री. निळकंठ जगन्नाथ काळे | खजिनदार |
| ६. | मा. श्री. चंदन सुधाकर अत्तरदे | संचालक |
| ७. | मा.प्रा.डॉ. श्री. विनय भास्कर पाटील | संचालक |

# Our Vision, Mission & Objectives

## VISION

Upliftment of the Society through qualitative teaching-learning process, leading to overall personality development of the pupils.

## MISSION

To impart higher and professional education for needy students to groom them to be responsible citizens, who work for sustainable socio-economic development of society with preservation of environment.

## OBJECTIVES

- To provide quality higher education to the students from the urban and rural area.
- To realize overall personality development of the students through extra and co-curricular activities.
- To expose the students to new ideas, concepts, new technologies and trends so as to enable them to face the challenges of competitive world.
- To improve the role and involvement of students in building better society and stronger nation.

# महाविद्यालयाने स्वयंनिर्वाही तत्वावर सुरु केलेले अभ्यासक्रम

(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न)

1) Certificate Course in Web Designing

2) Certificate Course in Yogic Foundation

कालावधी : १ वर्ष

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

अभ्यास केंद्र : धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव

सांकेतांक क्रमांक : ५३२०३

उपलब्ध अभ्यासक्रम : बी.ए., बी.कॉम.

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित

# शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव

(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न)
स्थापना २०००

## माहिती पत्रक

जळगाव हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून ते मध्य रेल्वेच्या मार्गावर वसलेले आहे. रेल्वे मार्गाने, विशेष करुन बस-मार्गाने हे शहर जिल्ह्यातील प्रमुख शहरांशी व खेड्यांशी जोडलेले असून आजूबाजूच्या जिल्ह्यांनाही हे शहर दळणवळणाच्या दृष्टीने खूपच सोईचे आहे. औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टीने महाराष्ट्रात या शहराला एक आगळे स्थान प्राप्त झालेले आहे. या शहरात उच्च शिक्षणासाठी विविध महाविद्यालये अस्तित्वात आहेत. संगणक व माहिती तंत्रज्ञान, विज्ञान या विषयाचे उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी, महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री मा. स्व. लोकसेवक मधुकरराव धनाजी चौधरी यांच्या प्रेरणेने या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

सन १९९४ या वर्षापासून धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी ही संस्था अस्तित्वास आहे. काळाची गरज ओळखून सन १९९४ या वर्षी या संस्थेने जळगांव शहरात संगणक विषयाचे प्रशिक्षण सुरु केले.

सद्य स्थितीत संस्थेमध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मान्यता प्राप्त विज्ञान शाखेतील संगणक शास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स, सूक्ष्मजीवशास्त्र, रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान शास्त्र, संख्याशास्त्र तसेच वाणिज्य व संगणक व्यवस्थापन शास्त्र शाखेतील बी.सी.ए. व बी.कॉम. हे विषय शिकविले जातात.

**प्रवेश :**

कोणीही विद्यार्थी हक्क म्हणून महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकणार नाही. प्राचार्य कोणाही विद्यार्थ्याचा प्रवेश काहीही कारण न देता नाकारु शकतात.

१) महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या कोणाही विद्यार्थ्यास महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज भरुन प्रवेश मिळविता येईल. प्रवेश अर्ज हा माहिती पत्रकाच्या शेवटी जोडलेला आहे. प्रवेश अर्जात भरलेली सर्व माहिती बिनचूक व परीपूर्ण असली पाहिजे. अपूर्ण वा चुकीच्या माहितीचा प्रवेश अर्ज स्विकारता येणार नाही.

२) प्रथम वर्ष बी.एस्सी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. ३९/१९९५ दिनांक १४/३/९५ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रवेश दिले जातील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदर परिपत्रक माहिती पुस्तिकेत शेवटी जोडपत्र क्रमांक-१ जोडलेले आहे.

३) प्रवेश घेते वेळी प्रत्येक विद्यार्थ्यास पासपोर्ट साईजचा फोटो **आपल्या ओळखपत्रावर लावावा लागेल.**

४) विद्यार्थ्यांनी आपल्या अगोदरच्या परीक्षेच्या गुण-पत्रिकेच्या खऱ्या नकलेच्या दोन प्रती व मागील परीक्षांच्या गुण-पत्रकाच्या मुळ प्रती तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. एफ.वाय. च्या वर्गात प्रवेश मिळवितांना पात्रता अर्ज व शाळा सोडल्याचा दाखला (लिव्हींग सर्टिफिकेट) (टि.सी.) ही कागदपत्रे आवश्यक आहेत. ह्यांची पूर्तता केल्याशिवाय कुठलाही प्रवेश अर्ज स्वीकारता येणार नाही. त्याचप्रमाणे अगोदरच्या परीक्षेची मुळ गुण-पत्रिकाही अर्जासोबत जोडलेली असली पाहिजे. इ. १२ वी चे मुळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला यांच्या आपल्या गरजेनुसार पुरेशा झेरॉक्स प्रवेश घेण्याआधी करून घ्याव्यात. प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही सबबीवर मुळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला मिळणार नाही.

५) एकदा विषयांची निवड करून अर्जात त्याची नोंद केल्यावर त्यावर बदल करता येणार नाही. तथापि आवश्यकता वाटल्यास प्राचार्यांच्या लेखी परवानगीने संबंधित विषयाच्या प्रमुखांच्या सह्यांनी तसा बदल करून घेता येईल. पण प्रत्येक विषयाच्या बदलासाठी दंड म्हणून १०० रुपये भरावे लागतील.

६) प्रथम वर्ष प्रवेश घेते वेळी आवश्यक कागदपत्रे
   १) १२ वी गुणपत्रक (मुळप्रत) + दोन झेरॉक्स प्रत
   २) शाळा सोडल्याचा दाखला (मुळप्रत) + दोन झेरॉक्स प्रत
   ३) जातीचा दाखला
   ४) गॅप सर्टिफिकेट (आवश्यक असल्यास)
   ५) दोन पासपोर्ट फोटो
   ६) पात्रता अर्ज
   ७) आधार कार्ड झेरॉक्स प्रत

   १५ ऑगस्ट नंतर मात्र कुठलाही बदल करता येणार नाही.

## पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate)

१) पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणाऱ्यासाठी प्रत्येक नवीन विद्यार्थ्यास एफ.वाय.च्या प्रवेशासाठी विद्यापीठाने त्यासाठी आकारलेली ५० रु. फी प्रवेश घेतांनाच भरावी लागेल. ही फी विद्यापीठाकडे पाठविण्यात येईल. पात्रता प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या परीक्षेस बसता येणार नाही.

२) महाराष्ट्र राज्यातील इतर विद्यापीठाकडून आलेल्या विद्यार्थ्यास पात्रता प्रमाणपत्र हे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून मिळवावे लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यास ''रजिस्ट्रार, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव'' ह्यांच्याकडे स्वतंत्र अर्ज पाठवावा लागेल. त्यासाठीचा विहीत

नमुन्यातील अर्ज महाविद्यालयातून मिळू शकेल. अर्ज योग्य प्रकारे भरुन ५० रु. फी सहीत विद्यापीठाकडे पाठवावा लागेल. त्याबरोबर अगोदरच्या कॉलेजची व विद्यापीठाची पुढील प्रमाणपत्रे जोडावे लागतील.

१) मायग्रेशन सर्टिफिकेट  २) ट्रान्सफरन्स सर्टिफिकेट
३) परीक्षा पास झाल्याचे प्रमाणपत्र  ४) हजेरी सर्टिफिकेट
५) गुण–पत्रिका  ६) वर्तनाचा दाखला

ही सर्व माहिती विद्यापीठाकडे पोहोचल्यावर विद्यापीठाकडून पात्रता केली जाते.

३) महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील कुठल्याही विद्यापीठाकडून आलेल्या विद्यार्थ्याने पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी महाविद्यालयाकडून त्यासाठीचा विहीत नमुन्यातील अर्ज घेऊन तो १२० रुपये फी सहीत महाविद्यालयात सादर करावयाचा आहे. त्याबरोबर पूर्वीच्या विद्यापीठाकडून मिळालेले मायग्रेशन सर्टिफिकेट आणि वर नमूद केलेली सर्व सर्टिफिकेट त्यासोबत पाठवावी लागतील.

४) यापूर्वी विद्यापीठाकडून किंवा ह्या पूर्वीच्या कॉलेज मधून मिळालेले पात्रता प्रमाणपत्र आणि इतर प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या कार्यालयात विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मुदतीचे आत सुपूर्द करण्याची जबाबदारी ही त्या त्या विद्यार्थ्याची आपली स्वतःची राहील.

५) दुसऱ्या महाविद्यालयातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालय बदलास विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विहीत अर्ज दोन प्रतीत भरुन दोन्ही महाविद्यालयंचे प्राचार्यांची शिफारस घ्यावी. अर्जासोबत महाविद्यालय बदल फी रु. २०/– कार्यालयात भरावी. विद्यापीठाची अंतिम मान्यता मिळाल्यावर अधिकृत प्रवेश देण्यात येईल.

६) पुर्नप्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास पुर्नप्रवेशासाठी विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरून त्यासोबत मागील परीक्षेची प्राप्त झालेली संपादणूक रद्द करणेसाठी मूळ गुणपत्रक व पुर्नप्रवेश हमीपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. त्यावर प्राचार्यांची शिफारस घ्यावी व रु. ७५/– फी कार्यालयास भरावी. विद्यापीठाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर अधिकृत प्रवेश देण्यात येईल. तसेच विषय बदल, विद्याशाखा बदल यासाठी सुद्धा विद्यापीठाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. त्यासाठी फी प्रत्येकी रु. ५०/– कार्यालयात भरावी.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : सरकारी शिष्यवृत्ती मिळविण्याकरीता करावयाची कार्यवाही -

१२ वी नंतरचे सर्व शिक्षणक्रमात प्रवेश घेणाऱ्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र समजण्यात आले आहे.

१२ वी नंतरचे शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी (एस.सी., एस.टी., एन.टी. व विशेष मागासवर्गीय) भारत सरकारची शिष्यवृत्तीची योजना मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जळगाव, मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल ह्यांच्या मार्फत राबविली जाते.

विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न जर रु. १,००,०००/– च्या आत असेल तर पूर्ण दराने

शिष्यवृत्ती मिळते. तसेच पालकांचे उत्पन्न जर रु. १,००,०००/- च्यावर दरम्यान असेल तर शिष्यवृत्ती मिळणार नाही. परंतु फक्त फी सवलतीचा लाभ मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी संपूर्ण फी भरावी. तसेच फ्रिशीपचा अर्ज सादर करावा लागेल. नंतर शासनाकडून रक्कम मिळाल्यानंतर संपूर्ण फीची रक्कम विद्यार्थ्यास परत केली जाईल. शिष्यवृत्तीचे अर्ज दि. ३१ जुलैच्या आत जमा करावयाचे आहे.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी आपले स्वतःचे बचत खाते बँक ऑफ बडोदा, मुख्य शाखा, जळगांव या बँकेमार्फत अदा केली जाईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. एस.सी. आणि एस.टी. या शिष्यवृत्ती करीता उत्पन्नाची मर्यादा २,००,०००/- च्या आत असणे आवश्यक आहे.

## टिप -

मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी स्वतंत्र शिष्यवृत्ती अर्ज फी सवलत अर्ज भरणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जाशिवाय हा आणखी वेगळा अर्ज राहील. ज्या विद्यार्थ्यांच्या सलग शिक्षणात खंड पडलेल्या काळात आपण काय करीत होतो ते त्यात नमूद करावे.

## शिस्त -

१) विद्यार्थ्यांच्या वागणुकीसंबंधी व अभ्यासासंबंधी महाविद्यालयाच्या अधिकारी व्यक्तीकडून वेळोवेळी जे सामान्य वा विशेष नियम केलेले असतील ते सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला म्हणजे महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या परिसरात त्यांच्या वागणुकीवर महाविद्यालयाच्या अधिकारी वर्गाचे नियंत्रण राहील हे गृहीत असते. योग्य कारणाशिवाय कोणत्याही विद्यार्थ्यास वर्गातील तासांना गैरहजर राहता येणार नाही. निकड असेल तेव्हा योग्य त्या मुदतीत प्राचार्यांकडे रजेचा अर्ज करुन रजा मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

२) प्राध्यापकांच्या सूचना बरहुकूम सर्व चाचण्यांना, सर्व परीक्षांना प्रत्येक विद्यार्थ्यास हजर राहणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्याने ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, समाज-विघातक किंवा हिंसक उद्दिष्टांच्या कुठल्याही चळवळीशी संबंध असणाऱ्या कोणत्याही राजकीय कार्यक्रमात कोणत्याही विद्यार्थ्यास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेता येणार नाही. ह्या नियमांचा भंग करणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव महाविद्यालयातून कमी करण्यात येईल. महाविद्यालयाची इमारत किंवा परिसराला विद्रुप करणे, फर्निचरची नासधूस, विजेचे कनेक्शन तोडणे, आवारातील सायकली व वाहने यांवर बसणे व त्यांची नासधूस करणे इ. नुकसानकारक गोष्टी आपणाकडून होणार नाही याची दक्षता प्रत्येक विद्यार्थ्याने घेतली पाहिजे. अशा गैरवर्तनाची गंभीरपणे दखल घेतली जाईल.

## ओळखपत्र (Identity Card)

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यास कार्यालयाकडून रोल नंबर व ग्रंथालयाकडून ग्रंथालय रजि. नं. दिला जाईल. रोल नंतर प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत ओळखपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयात उपस्थित असे पर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र नेहमी बरोबर बाळगले पाहिजे.

## उपस्थिती -

महाविद्यालय १५ जून पासून सुरु होईल.

१) उपस्थितीच्या दृष्टीने विद्यापीठाच्या परीक्षेस बसण्यास पात्र ठरण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची प्रत्येक सत्रातील एकूण दिवसांच्या शेकडा ८० टक्के उपस्थिती असणे अनिवार्य आहे.

२) एका दिवसाची उपस्थिती ह्याचा अर्थ त्या दिवसाच्या सर्व तासिका आणि ट्युटोरियल्स यांना हजर असणे असा आहे.

३) समाधानकारक उपस्थिती ह्याचा अर्थ महाविद्यालय चालू असतांना सर्व दिवशी उपस्थिती राहणे असा आहे. प्राचार्यांकडून मंजूर झालेल्या रजेचे दिवस यातून वगळण्यात येतील.

## बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रम

**Science Faculty** (Duration 3 years)

१) विज्ञान शाखेत सन २०००-२००१ ह्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने संगणकशास्त्र हा विषय शिकविण्यास महाविद्यालयास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार संगणकशास्त्र हा विषय महाविद्यालयात शिकविला जातो. प्रवेश संख्या मर्यादित असल्यामुळे आलेल्या अर्जांमधून गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. पात्रता : इ. १२ वी विज्ञान ही परीक्षा इंग्रजी, गणित व भौतिकशास्त्र हे विषय घेवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. फी संबंधीचा सविस्तर तक्ता माहितीपत्रकाच्या शेवटी जोडलेला आहे.

२) ज्या विद्यार्थ्यांना टी.वाय.बी.एस्सी. साठी भौतिकशास्त्र (फिजिक्स) हा विषय स्पेशल घ्यावयाचा असेल त्या विद्यार्थ्यास एफ.वाय.बी.एस्सी. ला गणित हा विषय घेणे आवश्यक आहे.

३) ज्या विद्यार्थ्यांना टी.वाय.बी.एस्सी. साठी इलेक्ट्रॉनिक्स सायन्स हा विषय स्पेशल घ्यावयाचा असेल त्या विद्यार्थ्यांनी एफ.वाय.बी.एस्सी. ला भौतिकशास्त्र व गणित आणि एस.वाय.बी. एस्सी. ला इलेक्ट्रॉनिक्स सायन्स सोबत भौतिकशास्त्र हा विषय घेणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयात खालील प्रमाणे विज्ञान शाखेत प्रवेश दिला जातो.**

## एफ.वाय.बी.एस्सी. -

बी.एस्सी. पदवीच्या प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यास पुढील पैकी कोणतेही चार विषय अभ्यासावे लागतील.

१) संगणकशास्त्र
२) संख्याशास्त्र
३) इलेक्ट्रॉनिक्स
४) गणित
५) भौतिकशास्त्र
६) रसायनशास्त्र
७) प्राणिशास्त्र
८) वनस्पती शास्त्र
९) मायक्रोबायोलॉजी
१०) भूगोल

**पुढील प्रमाणे दिलेल्या ग्रुपनुसार विषय शिकविले जातील.**

१) भौतिकशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र

२) संख्याशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र

३) भौतिकशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स, संख्याशास्त्र

४) भौतिकशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स, रसायनशास्त्र

५) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र

६) रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, मायक्रोबायोलॉजी

७) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र/प्राणिशास्त्र, भूगोल

**टिप** : पर्यावरण शास्त्र हा विषय सक्तीचा आहे.

## एस.वाय.बी.एस्सी. -

एस.वाय.बी.एस्सी. ला प्रवेश घेतेवेळी

१) एफ.वाय.बी.एस्सी. ला घेतलेल्या चार विषयांपैकी कोणतेही तीन विषय

२) इंग्रजी किंवा मराठी

३) सामान्यज्ञान हे विषय घ्यावे लागतील.

**पुढील प्रमाणे दिलेल्या ग्रुपनुसार विषय शिकविले जातील.**

१) गणित, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र

२) भौतिकशास्त्र, गणित, संगणकशास्त्र

३) भौतिकशास्त्र, गणित, संख्याशास्त्र

४) भौतिकशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स

५) भौतिकशास्त्र, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स

६) मायक्रोबायोलॉजी, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र/प्राणिशास्त्र

## टी.वाय.बी.एस्सी. -

१) संगणकशास्त्र

२) इलेक्ट्रॉनिक्स्

३) गणित

४) रसायनशास्त्र

५) मायक्रोबायोलॉजी

**टिप** : टी.वाय.बी.एस्सी. ला कुठलाही कोर्स सुरु करण्यासाठी कमीत कमी १२ विद्यार्थी असणे आवश्यक आहे.

# वाणिज्य विभाग (Commerce Faculty)

## A] First Year B.Com. First Year B.Com. - semester Pattern

| Paper | Semester - I | Paper | Semester - II |
|---|---|---|---|
| | Total papers 7 (50 marks each) | | Total papers 7 (50 marks each) |
| 01. | English for Business | 01. | English for Business |
| 02. | English (10213)/Marathi (10211)/Hindi (102112) | 02. | English (10223) / Marathi (10221) / Hindi (10222) |
| 03. | Micro Economic Analysis | 03. | Micro Economics |
| 04. | Financial and Cost Accounting | 04. | Financial and Cost Accounting |
| 05. | Computing Skills | 05. | Quantitative Techniques |
| 06. | Elective (any one)<br>a) Modern Office Management<br>b) Essential of e-Commerce<br>c) Co-operative Law & Micro Finance | 06. | Elective (any one)<br>a) Modern Office Management<br>b) Essential of e-Commerce<br>c) Co-operative Law & Micro Finance |
| 07. | Applied Component, Elective (any one)<br>a) Principles & Practices of Banking<br>b) Corporate Laws<br>c) Marketing & Advertising<br>d) Business Statistics<br>e) Principles & Practices of Insurance<br>f) Geography of Trade and Transport | 07. | Applied Component, Elective (any one)<br>a) Principles & Practices of Banking<br>b) Corporate Laws<br>c) Marketing & Advertising<br>d) Business Statistics<br>e) Principles & Practices of Insurance<br>f) Geography of Trade and Transport |

**Note - Besides these papers a student has to appear for a compulsory paper of 'Environmental studies' at semester II.**

## B] Second Year B.Com. Second Year B.Com. - semester Pattern

| Paper | Semester - III | Paper | Semester - IV |
|---|---|---|---|
| | Total papers 7 (50 marks each) | | Total papers 7 (50 marks each) |
| 01. | Macro Economics | 01. | Macro Economics |
| 02. | Business & Tax Laws | 02. | Business & Tax Laws |
| 03. | Business Management | 03. | Business Management |
| 04. | Corporate accounting & Costing | 04. | Corporate accounting & Costing |
| 05. | Computing Management | 05. | Business Communication |
| 06. | Elective (any one)<br>a) Business Entrepreneurship<br>b) Consumer Protection & Business Ethics<br>c) Financial Analysis & Business Journalism | 06. | Elective (any one)<br>a) Business Entrepreneurship<br>b) Consumer Protection & Business Ethics<br>c) Financial Analysis & Business Journalism |
| 07. | Elective (any one)<br>a) Modern Banking & Financial System<br>b) Corporate Regulatory Frame Work<br>c) Retail Management<br>d) Business Statistics & Operation Research<br>e) Production & Operations Management | 07. | Elective (any one)<br>a) Modern Banking & Financial System<br>b) Corporate Regulatory Frame Work<br>c) Retail Management<br>d) Business Statistics & Operation Research<br>e) Production & Operations Management |

**Note - Besides these papers a student has to appear for a compulsory paper of 'General Knowledge' (for semester IV).**

## C] Third Year B.Com. Third Year B.Com. - semester Pattern

| Paper | Semester - V | Paper | Semester - VI |
|---|---|---|---|
| | Total papers 7 (50 marks each) | | Total papers 7 (50 marks each) |
| 01. | Indian Economic Scenario | 01. | Indian Economic Scenario |
| 02. | Principles & Practices of Auditing | 02. | Principles & Practices of Auditing |
| 03. | Income Tax | 03. | Soft Skills Development |
| 04. | Human Resource Management | 04. | Human Resource Management |
| 05. | Elective (any one)<br>a) Modern Management Techniques<br>b) Import-Export Management<br>c) Economics of Global Trade & Finance | 05. | Elective (any one)<br>a) Modern Management Techniques<br>b) Import-Export Management<br>c) Economics of Global Trade & Finance |
| 06 & 07. | Elective (Any One Group)**<br>a) Advanced Accounting I & II<br>b) Advanced Cost & Management Accounting I & II<br>c) Advanced Banking I & II<br>d) Business Administration I & II | 06 & 07 | Elective (Any One Group)**<br>a) Advanced Accounting I & II<br>b) Advanced Cost & Management Accounting I & II<br>c) Advanced Banking I & II<br>d) Business Administration I & II |

**(** Optional Project Report of 50 Marks for Paper No. 7 SemVI)**

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) -

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे १७० विद्यार्थी व विद्यार्थिनींचे वरिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र युनिट कार्यरत आहे. ज्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना एन.एस.एस. मध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी एन.एस.एस. प्रमुखाकडे अर्ज करावा. आलेल्या अर्जामधून एन.एस.एस. प्रमुख विद्यार्थी व विद्यार्थिनींची निवड करतात. निवड करण्याचा संपूर्ण अधिकार एन.एस.एस. प्रमुख व प्राचार्य यांना असून ते कोणत्याही विद्यार्थ्यास कारण न देता एन.एस.एस. प्रवेश नाकारु शकतात.

## शैक्षणिक व इतर शुल्क विद्यार्थ्यास परत करण्याचे नियम -

१) प्रवेश घेतल्यापासून सात दिवसांच्या आत विद्यार्थ्याने जर प्रवेश रद्द केला तर प्रवेश शुल्क सोडून शैक्षणिक व इतर शुल्कामध्ये १० टक्के कपात करावी.

२) प्रवेश घेतल्यापासून पंधरा दिवसांच्या आत विद्यार्थ्याने जर प्रवेश रद्द केला तर प्रवेश शुल्क सोडून शैक्षणिक व इतर शुल्कामध्ये २५ टक्के कपात करावी.

३) प्रवेश घेतल्यापासून पंधरा दिवसानंतर जर प्रवेश रद्द केला तर कुठलेही शुल्क परत करु नये.

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

परिपत्रक क्रमांक : ३९/१९९५

मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार या परिपत्रकाद्वारे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष १९९५-९६ पासून प्रथम वर्ष कला, विज्ञान आणि वाणिज्य अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही पात्रता नियमांच्या अधिन राहून मान्यता प्राप्त तुकड्यांमध्ये मान्य प्रवेश संख्येतच गुणवत्तेनुसार खालील प्रमाणे करावी.

१) १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साधारण २० दिवसांच्या आत प्रवेशाचे अर्ज मागणी करून तेथून ५ दिवसात गुणवत्ता यादी जाहीर करावी व तद्नंतरच्या ५ दिवसात प्रवेश गुणवत्तेनुसार द्यावेत. ३० जुलै नंतर महाविद्यालयांना प्रवेश देता येणार नाहीत.

तथापि असे प्रवेश विद्यापीठाशी पूर्व परवानगी घेऊन देता येतील. विद्यापीठाकडे पूर्व परवानगीचे प्रस्ताव पाठवितांना मान्यता प्राप्त तुकड्यांची संख्या, मान्य प्रवेशांची संख्या, ३० जुलै रोजी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, आरक्षण संवर्गनिहाय इ. तपशील पाठविणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्राप्त झालेल्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

२) दरवर्षी ३ ऑगस्ट पर्यंत प्रत्येक महाविद्यालयाने गुणवत्ता यादी विद्यापीठाच्या पात्रता विभागात सादर करणे आवश्यक आहे. गुणवत्ता यादी प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थ्याचे शैक्षणिक पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) मान्यता प्राप्त तुकड्यांमध्ये मान्य प्रवेश संख्येएवढेच प्रवेश द्यावेत. जर जास्तीचे प्रवेश महाविद्यालयाने दिले तर त्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता विद्यापीठाकडून पूर्ण केली जाणार नाही.

४) प्रथम वर्ष कला वर्गात डी.एड. पदविका अभ्यासक्रम इंग्रजी विषयासह उत्तीर्ण केलेल्या व अभियांत्रिकी पदवीधारक विद्यार्थ्यांना एकूण प्रवेश क्षमतेच्या १० टक्के पर्यंत प्रवेश त्या त्या संवर्गातून देता येतील. तसेच प्रथम वर्ष विज्ञान व वाणिज्य वर्गात एकूण प्रवेश क्षमतेच्या १० टक्के पर्यंत प्रवेश अभियांत्रिकी पदवीधारक विद्यार्थ्यांना देता येतील.

सदर १०% प्रवेशांमधील प्रवेश वरीलप्रमाणे पूर्ण होऊ शकले नाहीत, तर त्या रिक्त जागांवर पात्रता नियमानुसार पात्र असलेल्या त्या त्या कोट्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत.

५) शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार (महाराष्ट्र ॲक्ट नं. XXX of 2006) एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागा मागासवर्गीय घटकांसाठी खालीलप्रमाणे राहील.

| संदर्भ | टक्केवारी |
|---|---|
| अ) अनुसूचित जाती व बौद्ध धर्मांतरी जाती | १३ |
| ब) अनुसूचित जमाती | ०७ |
| क) विमुक्त व भटक्या जमाती | |
| १) विमुक्त जाती व तत्सम चौदा जाती | ०.३ |
| २) भटक्या जमाती व (जानेवारी ९० पूर्वीच्या २% तत्सम जमाती) | २.५ |
| ३) भटक्या जमाती (धनगर व तत्सम) | ३.५ |
| ४) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ |
| ड) इतर मागासवर्गीय जाती | १९ |
| **एकूण** | **५०** |

इतर राखीव जागांच्या कोट्यामधील प्रवेश वरीलप्रमाणे पूर्ण होऊ शकत नसतील तर प्रथमतः उर्वरीत राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत. या व्यतिरिक्त जागा रिक्त राहिल्यास त्या जागांवर खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत.

उपरोक्त परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी ही विनंती.

जा.क्र. उमवि/९५/६/९/१५९१
दिनांक : २४/३/१९९५

सही–
उपकुलसचिव

# विद्यार्थ्यांसाठी विविध योजना



## कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :-

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी आहे, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, होतकरु व गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्याला श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे.स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे आदि मुख्य उद्देश योजनेचे आहेत. योजनेत विद्यार्थ्याने अध्ययनाच्या वेळेव्यतिरिक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षीत आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

## साहस कार्यशाळा :-

विद्यार्थ्यांना साहसीवृत्ती निर्माण होणेविषयी या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटाना धैर्याने सामोरे जाणे मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोपवे, पुल बांधणी, रस्ता दुरुस्ती, दिशा ओळख, आकाश निरीक्षण, आत्मसंरक्षण व प्रतीकार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १विद्यार्थिनी या कार्यशाळेत सहभागी होवू शकतात.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना :-

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेशित व विद्यापीठाच्या वसतिगृहात निवासित विद्यार्थ्यांपैकी जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिकसहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

## उमवि संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा :-

विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षा कौशल्य वृध्दिंगत करणेसाठी व पूर्वतयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर चाणक्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्वतयारीसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांसाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी हे या उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी, पी.एस.आय., तहसीलदार या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाद्वारे होईल. सदर परीक्षेत महाविद्यालयातील कितीही विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

## उमवि विद्यार्थी दत्तक योजना :-

विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग यातील शिक्षण घेणा-या गरजू व होतकरु विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून उमवि विद्यार्थी दत्तक योजना सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थिनी यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

## विद्यार्थी संशोधन योजना :-

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधक विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे मागे राहू नये या साठी संशोधक विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाद्वारे भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाचे विभाग व संलग्नीत महाविद्यालये यांचेसाठी संशोधन विकास योजना आहे. विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत विद्यार्थी संशोधन प्रोत्साहन योजना, मा. कुलगुरु प्रायोजित विशेष संशोधन योजना विज्ञान व तंत्रज्ञान विषयात विशेष कार्य करणा-या विद्यार्थ्यास जी. एच. रायसोनी यांचे सौजन्याने तीन संशोधक विद्यार्थ्यांना रु. ७,०००/- ते रु. १०,०००/- पर्यंत प्रतिमाह संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

## सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन :-

विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य, नाट्य, सुत्रसंचलन कार्यशाळा या क्षेत्रातील नव्या संकल्पना, तंत्रज्ञान अवगत व्हावे त्यांची सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

## युवती सभा कार्यशाळा :-

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींकरीता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरुपाच्या उपक्रमांचे आयोजन करणेकरीता युवती सभा अंतर्गत स्वंयसिध्दा - अभियान व विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थिनी सहभागी होवू शकतात.

## एकलव्य विद्याधन कर्ज योजना :-

एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी आहे. योजनेत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणा-या खर्चाच्या ७० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर बँकेद्वारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाद्वारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यास प्रवेशित काळात शासकीय/निमशासकीय/सहाकारी संस्था/बँका यांच्या कडून कोणतेही विद्यावेतन/शिष्यवृत्ती मिळत नसेल, असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

## मा. कुलगुरु वैद्यकीय निधी योजना :-

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजने शिवाय अपघाती/नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु. ५,०००/- मृत विद्यार्थ्याच्या पालकास मा.कुलगुरु वैद्यकीय निधीतून देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यास एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्यास उपचारासाठी योग्य त्या कागदपत्रांची खातरजमा करुन सहाय्य करण्यात येते.

**टिप: विद्यापीठ निधी आणि मा. कुलगुरु निधीतून राबविल्या जाणा-या विद्यार्थी कल्याणकारी योजनांची अधिक माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे.**


## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

संपर्क :- विद्यार्थी कल्याण विभाग, उ.म.वि., जळगाव, ०२५७-२२५७४१८,४१९

अधिक माहिती साठी संपर्क :-आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी

# ई-सुविधा माझी सुविधा, ईझी सुविधा!

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

1990 Grade-B(2.88) NAAC Re-Accredited ISO 9001:2008




विद्यार्थी मित्रहो,

कॉलेजच्या सुरवातीपासून ते शेवटपर्यंत अनेक कार्यालयीन कामाशी तुमचा संबंध येतो. ज्यामध्ये ॲडमिशनचे फॉर्म्स, एलिजिबिलिटी फॉर्म्स, टाइम-टेबल, हॉल-तिकीट, डिग्री सर्टिफिकेटस अशा अनेक गोष्टी वारंवार कॉलेज अथवा युनिव्हर्सिटीमध्ये जाऊन कराव्या लागतात. या कामांसाठी विद्यार्थी व कॉलेजला लागणारा वेळ, पैसा आणि परिश्रम यांची बचत करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना वैयक्तिक सुविधा घरबसल्या कमी वेळेत पोहचविण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा तर्फे ''ई-सुविधा'' हा उपक्रम एमकेसिएलच्या सहकार्याने सुरु करण्यात आला आहे. या ''ई-सुविधा'' उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी खालील पद्धतीने सहभागी व्हा.

आपला १६ अंकी पीआरएन (PRN) / DUPin कॉलेजमधून मिळवा.
इंटरनेटचा वापर करुन http://nmuj.digitaluniversity.ac
या साइटवर आपले ''ई-सुविधा'' अकाउंट ॲक्टिव्हेट करा.

आणि कॉलेज-युनिव्हर्सिटीच्या कागदपत्रांचे
सर्व व्यवहार करा आता एका क्लिकवर !



| अनु.क्र. | सुविधा | फायदे |
|---|---|---|
| १ | कॉलेज मध्ये नोंदविलेल्या नावातील स्पेलिंगच्या चुका सुधारण्यासाठी विनंती करा व त्याचे स्टेटस जाणून घ्या. | बदल करण्यासाठी कुठल्याही (फीजीकल) फॉर्म भरण्याची किंवा विद्यापीठात जाण्याची आवश्यकता नाही. |
| २ | तुमचा मोबाईल नंबर व वैयक्तीक माहिती अपडेट करा. | विद्यापीठातून निकाल, परीक्षेचे वेळापत्रक, असे **SMS** अलर्ट मिळवा. |
| ३ | निवडलेल्या विषयांचा अभ्यासक्रम (Syllabus) डाउनलोड करा. | योग्य अभ्यासक्रम योग्य वेळेत मिळवा. |
| ४ | जुन्या प्रश्नपत्रिका डाउनलोड करा | प्रश्न पत्रिका सोडवा व आत्मविश्वास वाढवा. |
| ५ | तुमचे इलिजिबिलिटी (पात्रता) स्टेटस तपासा. | विद्यापीठास नेमके कोणते कागदपत्र हवे आहेत, त्याची माहिती मिळवा. |
| ६ | परीक्षेसंबंधी तारखांबद्दल माहिती मिळवा. | आता परीक्षा फॉर्म भरताना लेट फी किंवा फॉर्मची तारीख चुकण्याची काळजी करु नका. |
| ७ | तुमच्या विषयांचे पूर्व नियोजन करण्यासाठी परीक्षेचे व्यक्तिगत वेळापत्रक डाउनलोड करा. | आता लांबलचक यादीतून वेळापत्रक उतरवून घेण्यासाठी नोटीस बोर्डजवळ गर्दी करायला नको. |
| ८ | सिस्टिम जनरेटेड प्री-फिल्ड एक्झाम फॉर्म्स | अर्ज घेण्याकरिता ताटकळत राहण्याची, किंवा हाताने भरण्याची गरज नाही. अर्जावर सही करुन कॉलेजमध्ये फी भरा. |
| ९ | व्यक्तिगत परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) मिळवा. | प्रत्येक पेपरची तारीख, परीक्षा केंद्राचा पत्ता व वेळ जाणून घ्या. |
| १० | पुर्न: मुल्यांकन (Revaluation) चा किंवा पुर्न: परीक्षेचा अर्ज मिळवा. | या करता विद्यापीठात जाण्याची आवश्यकता नाही. |
| ११ | ईझी - **EASY** (Employment Assistance Services to Youth)- शिष्यवृत्ती योजना. | शंभरावर शिष्यवृत्ती योजनांपैकी तुम्हाला सर्वाधिक सोयीच्या असलेल्या शिष्यवृत्ती निवडा आणि अर्ज करा. |
| १२ | ईझी - व्यावसायिक व शैक्षणिक अभ्यासक्रम व प्रमाणपत्रांची माहिती. | एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध. |
| १३ | ईझी - कमवा आणि शिका. | सुटीच्या दिवसांत कामाच्या अनुभवासह पॉकेट मनी कमविण्याची संधी, तीही तुमच्याच शहरात. |
| १४ | ईझी - नोकरीचा शोध. | हजारो नोकऱ्यांच्या पर्यायांतून तुमच्या शिक्षणाला साजेशी नोकरी शोधा. |
| १५ | ईझी - दिनदर्शिका. | देशभरात होणाऱ्या जॉब फेअर्सना हजेरी लावा. |
| १६ | ईझी - स्पर्धा परीक्षा. | विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी सुयोग्य मार्गदर्शन मिळवा. |
| १७ | बँकेत खाते उघडणे, ड्रायव्हिंग लायसेन्स काढणे, पासपोर्ट काढणे इ. साठीच्या वेब साईटच्या लिंक्स. | भारताचे जागरुक व स्वयं प्रेरित नागरिक व्हा. |
| १८ | ब्लॉग्ज. | मित्रांबरोबर शेअर करा. |
| १९ | आणि इतरही बरेच काही... | तुमचे लॉग इन ॲक्टिव्हेट करण्यासाठी **http://nmuj.digitaluniversity.ac** या वेब साईटला आजच भेट द्या आणि ई-सुविधा सोबत ईझी सुविधा मिळवा, सर्वांच्या पुढे रहा ! |




अधिक माहितीसाठी संपर्क
ई-सुविधा - विद्यार्थी सहाय्यता केंद्र (SFC)
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
( : ०२५७-२२५८४१८
E-mail:- sfc@nmuj.digitaluniversity.ac

For more Information Contact to
e-Suvidha - Student Facilitation Center (SFC)
North Maharashtra University, Jalgaon
( : 0257-2258418
E-mail:- sfc@nmuj.digitaluniversity.ac

MKCL's Digital University® Empower Students Digitally!

वर्ष दुसरे



भविष्यवेधी नेतृत्व
मा. उदय सामंत
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य

## महाराष्ट्र राज्य
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

MITSC

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

### आयएएस आपल्या भेटीला

- राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- पोलीस भरती
- बँकिंग सेवा
- स्टाफ सिलेक्शन कमिशन
- केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु पी एस सी)

### उद्योजक आपल्या भेटीला

- उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
- व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
- वित्त व्यवस्थापन
- निर्णय क्षमता
- जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
- मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
- आधुनिक तंत्रज्ञान

ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस

यासोबत सभासद शुल्क ₹ ३६५/-भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ०३ वर्ष प्रति वर्ष ०५ या पद्धतीने १५ कोर्स मोफत दिले जातील.

Subscribe me

SCAN ME

**नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी**
**7507652555 या नंबरवर आपले नाव करा**

https://careerkatta.mitsc.co.in

| Course List | |
|---|---|
| 1) Python Programming | 26) Digital Banking |
| 2) Python for AI/ML | 27) Digital Marketing |
| 3) Python for web Development | 28) Political Ethics and Value |
| 4) Cloud computing | 29) Leadership Development |
| 5) Devops | 30) Literacy about Judicial Process |
| 6) Data analytics with tableau and power BI | 31) Constitutional Values and Ethics |
| 7) Social Media Profile Management | 32) Certificate in Office Administration |
| 8) Financial Literacy | 33) Certificate in Training Management |
| 9) Event Management | 34) Organic Farming |
| 10) Fund Flow Management | 35) Fruits and Vegetables Drying Dehydration and Technology |
| 11) Communication Skill & Personality Development | 36) Certificate course in World Politics |
| 12)बी पी टी १९५० संस्था नोंदणी कायदा प्रशिक्षण | 37) Certificate course in Rural Development |
| 13) Road Safety and Awareness Training | 38) Scientific Temperament |
| 14) परदेशी नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास | 39) Green Chemistry |
| 15) Foundation Course in Business Law | 40) Renewable Energy |
| 16) माहिती अधिकार कायदा प्रशिक्षण | 41) Nanotechnology |
| 17) Soft Skill Training Program | 42) Biotechnology |
| 18) Certificate Course in Human Right | 43) Medical Lab Technology |
| 19) Certificate Course in Journalism | 44) Nano Biotechnology |
| 20) Communication Skill Program | 45) Introduction to Forensic Science |
| 21) Content Writing Course | 46) Tourism Management |
| 22) Basic of Cost & Works Accounting | 47) Forensic Accounting |
| 23) E- Filling | 48) Cyber Law |
| 24) Soft Skill Development | 49) Office Management |
| 25) Introduction to Basic Concept of Accounting | 50) Consumer Protection Act 2019 |

# करिअर कट्टा विद्यार्थी नोंदणी फॉर्म

1) नाव :- ...................................................................................

2) शिक्षण :- ...................................

3) ई-मेल आयडी :-...........................................................................

4) मोबाईल नंबर :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

5) महाविद्यालयाचे नाव :- ...................................................................

...................................................................................................... .

6) महाविद्यालयाचा कोड :- .....................................

7) करिअर कट्टा कोर्सचे नाव :-

- IAS आपल्या भेटीला ☐
- उद्योजक आपल्या भेटीला ☐

8) जिल्हा :- ....................................

9) तालुका :- .............................

10) विद्यार्थ्यांची सही :- ..................................

**बेटी बचाओ**
**बेटी पढाओ**



**झाडे लावा...**
**झाडे जगवा....!**


* प्रकाशक *

डॉ. आर.बी. वाघुळदे

प्राचार्य,

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित

शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव